# प्रकरण चौथे

## संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील जैन्याळ गावावरील प्रभाव

# प्रकरण चौथे

# 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचा जैन्याळ गावावरील प्रभाव'

(Impact of Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan on Jainyal Village)

**प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रकरणात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या जैन्याळ गावावरील प्रभावाचे विश्लेषण केले आहे. या प्रकरणात तीन स्थूल विभाग केले आहेत. पहिल्या विभागात जैन्याळ गावातील ज्या ७५ उत्तरदात्यांची अभ्यासासाठी निवड केली होती. त्यांची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी वर्णन केली आहे. दुसऱ्या विभागात अभियानामुळे जैन्याळ गावातील भौतिक पर्यावरणात्मक परिस्थितीत तसेच सामाजिक जीवनात घडून आलेल्या ठळक बदलांचे विश्लेषण केले आहे. तिसऱ्या विभागात ग्राम स्वच्छता अभयानातील जैन्याळच्या यशाला जबाबदार असलल्या घटकांचे विश्लेषण केले आहे.

## अ) विभाग पहिला : उत्तरदात्यांची सामाजिक – आर्थिक पार्श्वभूमी

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या ७५ उत्तरदात्यांच्या सामाजिक, आर्थिक, पार्श्वभूमीचे वर्णन खाली दिलेले आहे.

### १. उत्तरदात्यांचे वय :

उत्तरदात्यांच्या वयानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्र. ४.१ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र. ४.१

उत्तरदात्यांचे वयानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा वयोगट | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | तरुण वयोगट | २९ | ३८.७ |
| २ | मध्यमवयीन गट | ३६ | ४८.० |
| ३ | वृद्ध गट | १० | १३.३ |
| | एकूण | ७५ | १००.० |

सारणी क्र. ४.१ वरून असे दिसून येते की, निवडलेल्या नमुन्यात मध्यमवयीन वयोगटातील उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वाधिक ३६ (४.८%) असून त्या खालोखाल तरुण वयोगटातील २९ (३८.७%) उत्तरदाते आहेत.

## २) वैवाहिक दर्जा :

उत्तरदात्याचे त्यांच्या वैवाहिक दर्जानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्र. ४.२ मध्ये दिले आहे.

सारणी क्र. ४.२

उत्तरदात्यांचे त्यांच्या वैवाहिक दर्जानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विवाहित | ६९ | ९२ |
| २ | विधवा | ६ | ८ |
| | एकूण | ७५ | १०० |

सारणी क्र. ४.२ असे दिसून येते की, निवडलेल्या उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक ६९

(९२%) उत्तरदात्या या विवाहित असून उर्वरित ६ (८%) उत्तरदात्या विधवा होत्या.

**३) जात :**

उत्तरदात्यांचे त्यांच्या जातीनुसार केलेले वर्गीकरण सारणी क्र. ४.३ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र. ४.३

उत्तरदात्यांच्या जातीनुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठा | ६१ | ८१.३ |
| २ | महार | ७ | ९.३ |
| ३ | गुरव | ४ | ५.३ |
| ४ | लोहार | २ | २.७ |
| ५ | बौद्ध | १ | १.३ |
| | एकूण | ७५ | १०० |

सारणी क्र. ४.३ वरून असे दिसून येते की, अभ्यासासाठी निवडलेल्या उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक ६१ (८१.३%) उत्तरदाते मराठा जातीचे होते तर उर्वरितांमध्ये महार ७ (९.३), गुरव ४ (५.३), लोहार २ (२.७) बौद्ध १ (१.३%) इ. जातींच्या सदस्यांचा समावेश होता.

**४. जात प्रवर्ग :**

उत्तरदात्यांचे त्यांच्या जात प्रवर्गानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्र. ४.४ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र. ४.४

उत्तरदात्यांच्या जात प्रवर्गानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ओपन | ६१ | ८१.३ |
| २ | एस.सी. | ८ | १०.७ |
| ३ | ओ.बी.सी. | ६ | ८.० |
| | एकूण | ७५ | १०० |

सारणी क्र. ४.४ वरून असे दिसून येते की, अभ्यासासाठी निवडलेल्या उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक ६१ (८१.३%) उत्तरदाते 'खुल्या' प्रवर्गातील होते, तर ८ (१०.७%) 'मागासवर्गीय जाती प्रवर्गातील' उत्तरदात्या आणि ओबीसी 'इतर मागासवर्गीय' ६ (८) इतके उत्तरदाते होते.

**५. धर्म :**

उत्तरदात्यांचे धर्मानुसार केलेले वर्गीकरण ४.५ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र. ४.५

उत्तरदात्यांचे त्यांच्या धर्मानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | ७२ | ९६ |
| २ | बौद्ध | ३ | ४ |
| | एकूण | ७५ | १०० |

सारणी क्र. ४.५ वरून असे दिसून येते की, अभ्यासासाठी निवडलेल्या

उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक ७२ (९६%) हे हिंदू धर्माचे होते तर उर्वरित ३ (४%) बौद्ध धर्माचे उत्तरदाते होते.

## ६) शैक्षणिक दर्जा :

उत्तरदात्यांचे त्यांच्या शैक्षणिक दर्जानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्र. ४.६ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र. ४.६

उत्तरदात्याचे त्यांच्या शैक्षणिक दर्जानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निरक्षर | ४५ | ६०.० |
| २ | १ ते ४ थी | ५ | ६.७ |
| ३ | ५ वी ते ७ वी | १५ | २०.० |
| ४ | ८ वी ते १० वी | ५ | ६.७ |
| ५ | उच्चमाध्यमिक | १ | १.३ |
| ६ | पदव्युत्तर | १ | १.३ |
| ७ | साक्षरता अभियानातून साक्षर | ३ | ४.० |
| | एकूण | ७५ | १०० |

सारणी क्र. ४.६ वरून असे दिसून येते की, अभ्यासासाठी निवडलेल्या उत्तरदात्यामध्ये ३० किंवा (४०%) उत्तरदाते साक्षर तर, ४५ (६०%) उत्तरदाते निरक्षर होते. महाविद्यालयीन पातळीवरील शिक्षण घेतलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे दिसून आले.

### ७) प्रमुख व्यवसाय :

उत्तरदात्यांचे त्यांच्या प्रमुख व्यवसायानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्र. ४.७ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र. ४.७

उत्तरदात्यांचे त्यांच्या प्रमुख व्यवसायानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गृहिणी | १२ | १६.० |
| २ | शेती व गृहिणी | ५३ | ७०.७ |
| ३ | गृहिणी व शेतमजूर | ०८ | १०.७ |
| ४ | गृहिणी व शिलाईकाम | १ | १.३ |
| ५ | गृहिणी व लोहारकाम | १ | १.३ |
| | एकूण | ७५ | १०० |

सारणी क्र. ४.७ वरून असे दिसून येते की, निवडलेल्या उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक ५३ (७०.७%) उत्तरदाते त्यांच्या घरकामाबरोबरच शेती व्यवसाय करणारे होते. तर त्या खालोखाल उर्वरित उत्तरदात्यामध्ये घरकामाशिवाय मजुरी करणारे, शिवणकाम, लोहारकाम करणारे उत्तरदाते होते.

### ८) कुटुंबाचा प्रकार :

उत्तरदात्यांचे त्यांच्या कुटुंबाच्या प्रकारानुसार कलेले वर्गीकरण सारणी क्र. ४.८ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र. ४.८

उत्तरदात्यांचे कुटुंबाच्या प्रकारानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | संयुक्त कुटुंब | ४४ | ५८.७ |
| २ | विभक्त कुटुंब | ३१ | ४१.३ |
| | एकूण | ७५ | १००.० |

सारणी क्र. ४.८ वरून असे दिसून येते की, निवडलेल्या उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक ४४ (५८.७%) उत्तरदाते हे संयुक्त कुटुंबातील होते तर उर्वरित ३१ (४१.३%) उत्तरदाते हे विभक्त कुटुंबातील होते.

## ९) कुटुंबाच्या मालकीची एकूण जमीन :

उत्तरदात्यांचे त्यांच्या कुटुंबाच्या मालकीची एकूण जमीनीनुसार वर्गीकरण सारणी क्र. ४.९ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र. ४.९

उत्तरदात्याचे त्यांच्या कुटुंबाच्या मालकीची एकूण जमिनीनुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ० | जमीन नसलेले | १२ | १६ |
| १ | १ ते २.२० (सीमांत शेतकरी) | ३३ | ४४ |
| २ | २.२१ ते ५ (लहान शेतकरी) | १९ | २५.३ |
| ३ | ५.२० ते १० (मध्यम शेतकरी) | ९ | १२ |
| ४ | १० एकरहून अधिक (मोठे शेतकरी) | २ | २.७ |
| | एकूण | ७५ | १०० |

सारणी क्र. ४.९ वरून असे दिसून येते की, सर्वाधिक ३३ (४४%) उत्तरदात्यांकडे १ ते २.२० एकर स्वत:च्या मालकीची जमीन असून ते सीमांत शेतकरी होते. १९ (२५.३%) उत्तरदात्यांकडे २.२१ ते ५ एकर जमिन असून ते लहान शेतकरी, ९ (१२%) उत्तरदात्याकडे ५.२० ते १० एकर जमिन असून ते मध्यम शेतकरी होते, २ (२.७%) उत्तरदात्यांकडे १० एकर हून अधिक जमिन असून ते मोठे शेतकरी होते. उर्वरित १२ (१६%) उत्तरदात्यांकडे कुटुंबाच्या मालकीची जमिन नसून ते मजुरी करणारे होते.

### १०) कुटुंबाचे सरासरी एकूण वार्षिक उत्पन्न :

उत्तरदात्यांचे त्यांच्या कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्नानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्र. ४.१० मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र. ४.१०

उत्तरदात्यांचे त्यांच्या कुटुंबाचे सरासरी एकूण वार्षिक उत्पन्नासुार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | No Response | १ | १.३ |
| २ | १,००० ते १५,००० | ४३ | ५७.३ |
| ३ | १५,००१ ते ६०,००० | २३ | ३०.७ |
| ४ | ६१,००० ते ८०,००० | ३ | ४.० |
| ५ | ८१,००० ते ३,००,००० | ५ | ६.७ |
| | एकूण | ७५ | १००.० |

सारणी क्र. ४.१० वरून असे दिसून येते की, निवडलेल्या उत्तरदात्यांमध्ये बहुसंख्य (४३ किंवा ५७.३%) उत्तरदाते १५,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणारे होते. त्या खालोखाल २३ (३०.७%) उत्तरदाते १५००१ ते ६०,००० इतके वार्षिक उत्पन्न असणारे होते. ८१,००० ते ३,००,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणारे केवळ ५ (६.७%) उत्तरदाते

होते.

## ब) विभाग दुसरा : संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामुळे गावात घडून आलेल्या बदलांचे विश्लेषण

प्रस्तुत विभागात, अभियानामुळे जैन्याळ गावातील भौतिक परिस्थिती, पर्यावरण संवर्धन विषयक बाबी आणि सामाजिक जीवनात घडून आलेल्या बदलांचे थोडक्यात विश्लेषण करण्यात आले आहे.

### अ) गावातील भौतिक परिस्थितीत बदल :

#### १) रस्त्यांची दुरूस्ती :

अभियानापूर्वी जैन्याळ गावातील रस्ते कच्चे होते व रस्त्यावर खाचखळगे होते. अभियानकाळात रस्त्यांची दुरूस्ती करण्यात आली. गावातील रस्त्यातील खाचखळगे, बाजूपट्ट्या मुरूम टाकून दुरूस्त केले. लोकवर्गणी आणि आमदार फंडातून मिळालेली रक्कम व श्रमदान यांच्या सहाय्याने गावातील रस्त्याचे डांबरीकरण केले आहे. रस्त्यांची दुरूस्ती हा महत्त्वाचा बदल अभियानामुळे घडून आलेला आहे. त्यामुळे खेडेगाव असूनही शहराप्रमाणे गावातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण झाले आहे.

#### २) रस्त्यांची स्वच्छता :

अभियानापूर्वी जैन्याळ गावातील रस्ते खूपच अस्वच्छ होते. गटारे लहान असल्यामुळे सांडपाणी रस्त्यावरच साठून राहत होते. रस्ते कधीही झाडले जात नव्हते. अभियान काळात ग्रामस्थांच्या श्रमदानातून रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या रानवेली, झुडपे घाणेरी काढून रस्ते स्वच्छ केले. अभियानकाळात रस्त्यांचे डांबरीकरण करून रस्त्याच्या दुतर्फा दुरांडा फुलविला आहे. तसेच रस्त्यावरील केरकचरा ज्या-त्या गल्लीतील तरुण मंडळाचे सदस्य गोळा करतात. त्यामुळे गाव सध्या स्वच्छ व सुंदर दिसतो. रस्त्याच्या सुरूवातीलाच आकर्षक स्वागत कमानीमुळे रस्त्यांचे सौंदर्य वाढलेले आहे.

### ३) गटारांची दुरूस्ती :

अभियानपूर्व काळात गावातील गटारीतील सांडपाणी काही ठिकाणी रस्त्यावर घराभोवती साठून राहत होते. गावातील सर्व गटारे भरून वहात असायचे. त्यामुळे डासांचे साम्राज्य होते. हगवण, टाईफाईड, मलेरिया यासारख्या रोगांचा प्रादुर्भाव अधिक होता. अभियानकाळात मात्र घाणीने तुडंबलेल्या गटारी स्वच्छ केल्या आणि नादुरूस्त गटारे किरकोळ दुरूस्त केली. पण आज यामध्ये आमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. सध्या कोठेही गटर्समध्ये पाणी तुंबून रहात नाही. तसेच रस्त्यावर व घराभोवती कोठेही सांडपाणी साठून रहात नाही. गावातले सांडपाणी व्यवस्थितरित्या गटारीतून वहाते. गावात अभियानापूर्वी २६० मी. इतकी गटर्स होती. ग्रामपंचायत अहवालात नमूद केल्याप्रमाणे आता मात्र १२०० मी. इतकी गटर्स बांधून घेतली आहेत. डासांचे साम्राज्य नष्ट करण्यासाठी गटर्स बंदिस्त (भूमिगत) करण्यात आलेली असल्याचे गावच्या निरीक्षणावरून दिसून आले. यामुळे गावात गटर्स आहेत की नाही हे सुद्धा लक्षात येत नाही.

### ४) पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन :

अभियानापूर्वी गावात पिण्याच्या पाण्याची खूपच टंचाई होती. गावाबाहेर सार्वजनिक विहीर होती. त्याच विहिरीचे पाणी संपूर्ण गाव वापरत होते. त्यामुळे गाव टँकरग्रस्त होते. पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण करत नसल्यामुळे पाण्यापासूनसुद्धा अनेक रोगांचा प्रादुर्भाव होता. गावात अभियान सुरू झाल्यानंतर मात्र प्रथमत: पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण करण्यात आले. त्यामुळे जलजन्य रोगांचा नायनाट झाला. सध्या लोकवर्गणीतून ४५० फूट बोअर (विंधन विहिर) मारून त्यावर ५ एच.पी. चा सबमर्सिबल पंप लोक वर्गणीतून बसविला आहे. त्यामुळे पूर्वीचा टँकरग्रस्त गाव आज टँकरमुक्त झाला आहे. विंधन विहिरीवरूनच गावाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो. अभियानकाळात सार्वजनिक नळांना तोट्या नव्हत्या. त्या संपूर्ण चालू करून घेतल्या.

सध्या विंधन विहिरी वरूनच गावातील ३५,५०० लि. ची टाकी, संताजी नगरातील ३,००० लि. ची टाकी, श्रमनगरातील ३,००० लि. ची टाकी सकाळ संध्याकाळ असे दिवसातून दोन वेळा भरली जाते. पिण्याचे पाणी एकाच ठिकाणी असल्याने पाण्याचा वापर काटकसरीने केला जातो. तसेच उन्हाळ्यात पिण्याचे पाणी रेशनिंग पद्धतीने दिले जाते. पाण्याचा योग्य प्रमाणातच वापर केला जातो.

अभ्यासासाठी निवडलेल्या ७५ उत्तरदात्यांनी प्रश्नाला अनुसरून सांगितले की पाण्याची बचत करून आदल्या दिवशी शिल्लक राहिलेल्या पाण्याचा दुसऱ्या दिवशी जनावरांसाठी, घरगुती वापरासाठी, अंघोळीसाठी, शौचालयासाठी, शेण कालविण्यासाठी, बागेसाठी, भांडी धुण्यासाठी, कपडे धुण्यासाठी केला जातो. अभ्यासासाठी निवडलेल्या सर्व उत्तरदात्यांनी पाणी शुद्धीकरणासाठी दररोज टी.सी.एल. पावडरचा वापर नियमित केला जातो असे सांगितले. ४८ (६४%) उत्तरदात्यांनी पाणी शुद्ध करण्याचे प्रशिक्षण घेतल्याचे सांगितले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे घरातील पाणी हाताळण्याबाबत घरोघरी जाऊन महिला कार्यकर्त्यांनी प्रबोधन केले होते.

उत्तरदात्यांची मुलाखत घेत असताना उत्तरदात्यांच्या घराच्या निरीक्षणावरून असे दिसून आले की प्रत्येक घरात पिण्याचे पाणी स्वतंत्र व उंच ठिकाणी ठेवून त्यामध्ये हात न बुडवता वगराळानेच पाणी दिले जाते. तसेच वापराचे पाणी ही स्वतंत्र बंदिस्त ठेवले जाते. एकंदरीत गावात पाण्याचा अपव्यय टाळलेला दिसून आला.

शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत १०,००० लि. टाकीचे बांधकाम करून अंगणवाडी इमारतींचे संपूर्ण पाणी एकत्रित केले जाते. उन्हाळ्यात शिवकालीन पाणी साठवण टाकीचे पाणी घरगुती कामासाठी वापरले जात असल्याचे उत्तरदात्यांनी सांगितले. गावच्या बाहेर कपडे धुण्यासाठी सार्वजनिक विहिरीजवळ स्वतंत्र धोबीघाट बांधण्यात आलेला आहे.

अभ्यासासाठी निवडलेल्या उत्तरदात्यांच्या मुलाखतीवरून व स्वत: केलेल्या निरीक्षणावरून असे दिसून आले की, ३३५०० लि. पाण्याच्या टाकीवर गावातील १६३२ लोकसंख्या, २८६ कुटुंबे अवलंबून आहेत. पाणी अपुरे आहे तरीही त्याचा वापर काटकसरीने कसा करावा हे पहायला मिळाले. दरवर्षी १ एप्रिल या दिवशीच वसुली १००% करण्याचे ठरविले. तसेच पाणी पट्टीदर सार्वजनिक १०० रु. प्रमाणे भरला जातो. सर्वांना पिण्याचे पाणी आवश्यक तेवढ्या प्रमाणात मिळते.

### ५) शौचालय व्यवस्थापन :

अभियानापूर्वी जैन्याळ गावातील सुमारे ७०% लोक उघड्यावर शौचालयासाठी जात होते. एस.टी. च्या प्रवासात मैल्याची दुर्गंधी आली की गाव असल्याचा पत्ता लागायचा. प्रवासी नाकाला रुमाल लावायचे. गावामध्ये येण्यासाठी येणारा रिंगरोडवर दोन्ही बाजूंनी गाजरगवत व तिथेच लोक शौचास बसत होते. त्यामुळे तेथून येताना पायवाट दुर्गंधी वाटत होती. अभियानकाळात शौचालयाचे महत्त्व गावामध्ये पटवून देऊन शौचालय बांधण्यास प्रवृत्त केले. लोक जिथे शौचास बसत होते तेथून येणारा दुर्गंधी वाटत असणारा रस्ता खुला करून ग्रामस्थांनी त्यावर वृक्षारोपण केले. अभियानापूर्वी गावामध्ये १०४ शौचालये होती. अभियानापूर्वी १८२ कुटुंबाकडे शौचालय नव्हते. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली होती अशा ४१ लोकांनी अभियानकाळातच शौचालये बांधून घेतली. मात्र १४१ कुटुंबे शौचालयाविना होती. सदर लोकांची शौचालय बांधून घेण्याची इच्छा होती पण आर्थिक स्थिती नसल्यामुळे शौचालय बांधू शकत नव्हते.

अभ्यासासाठी निवडलेल्या ७५ उत्तरदात्यांनी या संदर्भातील प्रश्नाला दिलेल्या उत्तरावरून असे दिसून आले की, ६२ किंवा ८७.७ उत्तरदात्यांकडे स्वत:ची शौचालये होती तर उर्वरित १३ किंवा १७.३% उत्तरदात्यांकडे स्वत:च्या मालकीचे शौचालय नव्हते. मात्र आता सार्वजनिक शौचालये उपलब्ध होती. तसेच अभियानापूर्वी ३६ (४८%)

उत्तरदात्यांकडे शौचालये होती. २६ (३४.७%) उत्तरदात्यांनी अभियानानंतर शौचालये बांधली तर उर्वरित १३ (१७.३%) उत्तरदात्यांकडे शौचालये नसून ते सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात.

गावच्या ग्रामसेवकांनी अभियानकाळात ग्रामपंचायतीने जिल्हा विकास योजनेतून कर्ज घेऊन प्रत्येक लाभार्थींना ५,००० रु. देऊन ७४ शौचालये बांधली. संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमातून २० शौचालयांचे काम केले होते. ४७ कुटुंबापैकी ३७ कुटुंबांना ग्रामपंचायतीकडून कर्ज देऊन शौचालय बांधकाम केले होते. उर्वरित १० कुटुंबानी बायोगॅस व शौचालय असे बांधकाम केले. असे सर्व २८६ कुटुंबाचे शौचालयाचे बांधकाम करून गाव हागणदारीमुक्त केले. याशिवाय प्राथमिक शाळेसाठी २ शौचालये, अंगणवाडीकरता १ स्वतंत्र शौचालय, ग्रामपंचायत ऑफीसमध्ये १ स्वतंत्र शौचालय, बसथांब्याजवळ १ स्वतंत्र शौचालय अशी सोय केली आहे. गावामध्ये एकूण ३ ठिकाणी मानवी विष्ठेवर गॅस निर्मिती केली आहे. गावात एकूण ७१ लोक मैल्याचा स्वयंपाकाच्या गॅसकरिता उपयोग करतात. तसेच उघड्यावर शौचास बसणाऱ्या व्यक्तीकडून १०० रु. दंड आणि उघड्यावर शौचास बसणाऱ्या व्यक्तीस दाखवून देणाऱ्या व्यक्तीस ५० रु. बक्षिस दिले जाते, अशीही माहिती संशोधिकेला मिळाली. अभ्यासासाठी निवडलेल्या ७५ उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सर्वजण शौचालयाचा नियमितपणे वापर करतात, असेही त्यांनी सांगितले. तसेच २००५ चा हागणदारी मुक्तगाव व याविषयीचा 'निर्मुलग्राम' पुरस्कार व २ लाख रु. चे पारितोषिक जैन्याळ गावाला मिळाले आहे.

### ६) सांडपाणी व्यवस्थापन व डास नियंत्रण

अभियानपूर्व काळातील सांडपाण्याची स्थिती बघितली तर खूपच वेगळी होती. सांडपाण्याचे पूर्वी योग्य व्यवस्थापन नव्हते. गावातील सांडपाणी काही ठिकाणी रस्त्यावर तर काही ठिकाणी घराभोवती साठून रहात होते. त्यामुळे गावात डासांचे साम्राज्य अधिक

होते. रस्त्याकडेची गटारे घाणीने तुडूंब भरलेली असायची. त्यामुळे रस्त्याकडेला गटारे आहेत हे दिसतच नव्हते. गावात घाणीचे साम्राज्य होते. अभियानकाळात मात्र तरुण मंडळातील तरुणांनी संपूर्ण गटर्स स्वच्छ करून गटारींची किरकोळ दुरूस्ती केली. त्यामुळे निदान घराभोवती व रस्त्यावर पाणी साठायचे बंद झाले होते. सध्या मात्र सांडपाण्याचा योग्य निचरा करण्यासाठी गटारींचे बंदिस्त (भूमिगत) बांधकाम केलेले गावच्या निरीक्षणावरून दिसून आले. ज्या घरांना गटारे जोडली गेली नाहीत अशा ४२ कुटुंबांना शोषखड्डे बांधून दिले आहेत. त्यामुळे सध्या तरी कोठे रस्त्यावर अथवा घराभोवती सांडपाणी साठून राहत नाही. गावात गटारे आहेत की नाहीत हे सुद्धा कळत नाही.

गावात 'गप्पी मासे पैसाद केंद्र' तयार केले असून सदर पैदास केंद्रातून गावाबाहेर ज्या ठिकाणी पाणी साठून राहते अशा ठिकाणी गप्पी मासे सोडून डासांची उत्पत्ती कमी केली होती. गावात सांडपाण्यावर १४६ परसबागा तयार केल्या होत्या. गावात अभियानापूर्वी २८० मी. इतकी गटर्स होती. आता मात्र २१०० मी. इतकी गटर्स करून ती बंदिस्त केल्याचे दिसून आले. सांडपाण्याचा पुर्नःवापर करून धोबी घाटाजवळ औषधी वनस्पतींची लागवड केलेली दिसून येते. अभियान राबविल्यानंतर या सांडपाण्यावर केळीची लागवड करून यापासून ग्रामपंचायतीला चांगले उत्पन्न मिळाले होते.

सांडपाण्यावर एकूण १४ शेतकऱ्यांनी मिरचीचे, भाताचे आणि हायब्रीड पिकांचे उत्पादन घेतले होते. सदरचे सर्व लोकांना वार्षिक ५००/- प्रमाणे आकारणी केली जात असल्याचे गावच्या ग्रामसेवकांनी आपल्या मुलाखतीत सांगितले.

अभ्यासासाठी निवडलेल्या ७५ उत्तरदात्यांच्या मुलाखतीवरून असे दिसून आले की, बहुसंख्य ४० (५३.३%) उत्तरदात्या घरातील सांडपाण्याचे नियोजन परसबागेसाठी करत होत्या. तर त्या खालोखाल १९ (२५.३%) उत्तरदात्यांनी सांडपाण्याचे नियोजनासाठी शोषखड्डे असल्याचे सांगितले. उर्वरित उत्तरदात्यांनी सांडपाणी ओढ्याला, गटारीत, गारीत सोडल्याचे सांगितले.

## ७) जनावरे आणि गोठा स्वच्छता :

अभियानापुर्वी जनावरे व गोठा स्वच्छतेकडे तितकेसे लक्ष दिले जात नव्हते. आठवड्यातून एकदा-दोनदा जनावरे धुतली जात होती. अभियानकाळात मात्र ग्रामस्थांना जनावरे व गोठा स्वच्छता याविषयी पशुवैद्यकीय अधिकारी व ग्रामसेवकांकडून मार्गदर्शन मिळाले. त्याचकाळात जनावरे व गोठा स्वच्छता स्पर्धा घेतली गेली होती. जनावरांना साथीचे रोग होऊ नयेत यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत जनावरांचे आरोग्य शिबीर घेतले होते. पशुवैद्यकीय अधिकारी यांनी लसीकरण, जनावरांचे गोठा स्वच्छता, त्यांच्या मलमूत्राची विल्हेवाट गोठे निर्जंतुकीकरण इ. बाबत माहिती सांगितल्यामुळे जैन्याळ ग्रामस्थ जनावरांची व गोठ्याची सतत स्वच्छता ठेवत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

जनावरांचे गोठ्यामध्ये साठणाऱ्या घन कचऱ्याची विल्हेवाट संबंधीत घरमालक कंपोस्ट खताकरिता करतात. जनावरांना साथीचे रोग होऊ नयेत म्हणून लसीकरण केले जाते. गोठ्याची सुद्धा वेळोवेळी स्वच्छता केली जात असल्याचे अभ्यासासाठी निवडलेल्या उत्तरदात्यांनी सांगितले.

## ८) दैनंदिन कचरा व्यवस्थापन :

अभियानपूर्व काळात एकही कचराकुंडी नव्हती. दैनंदिन कचरा सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर टाकला जात होता. त्यामुळे गाव खूपच अस्वच्छ होता. सार्वजनिक ठिकाणी राणवेली तसेच घाणीचे साम्राज्य होते. अभियानकाळात मात्र ३५ ठिकाणची अतिक्रमणे संबंधीत मालकाने स्वत: काढून घेतली. त्यामुळे तेथे ग्रामपंचायत कार्यालय, सामुदायिक शौचालय व औषधी वनस्पती, रस्ता इ. कामाकरिता त्याचा उपयोग झाला.

अभियानकाळात घनकचऱ्याकरिता २८६ वैयक्तीक कचराकुंड्या व १४ सार्वजनिक कचराकुंड्या ठेवल्या होत्या. तसेच गावातील प्रमुख चौकात ओला-सुका कचरा काच, प्लास्टीक, धातू इ. साठी दोन स्वतंत्र ठिकाणी कचरा कुंड्या बांधण्यात

आल्या होत्या. कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यासाठी प्रत्येक गल्लीत दररोज निघणारा कचरा प्रत्येक प्रभागातील मंडळांची मुले त्यांच्या घंटागाडीतून वर्गवारी करत होती. सदरचा कचरा हा नॅडेप प्रकल्पात टाकून त्याचे शास्त्रीय पद्धतीने खत तयार केले जात होते. याबरोबर गावात भव्य असा गांडूळखत प्रकल्प तयार केला होता. यापासून ग्रामपंचायतीला आर्थिक उत्पन्न मिळाले होते. सार्वजनिक कचऱ्याची विल्हेवाट युवक मंडळे गांडूळ खत व नॅडेप खत प्रकल्पासाठी करीत होती. कचरा नियमितपणे मंडळामार्फत आजही उचलला जात असल्याचे गावच्या केलेल्या निरीक्षणावरून दिसून आले.

अभ्यासासाठी निवडलेल्या ७५ उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य ६८ (९०.७%) उत्तरदाते हे अभियान राबविण्यापूर्वी घरातील कचरा आपापल्या गारीत टाकत होते, तर उर्वरित ६ (८%) उत्तरदात्या घरगुती कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकत होत्या. यापैकी एक उत्तरदाती आपल्या घरगुती केरकचरा शेतात टाकत होती.

अभ्यासासाठी निवडलेल्या ७५ उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य ६९ (९२%) उत्तरदात्या अभियान राबविण्यापूर्वी घरात कचरा कुंडी ठेवत नव्हत्या. तर उर्वरित ६ (८%) उत्तरदात्या कचरा टाकण्यासाठी घरात कचराकुंडीचा वापर करत होत्या. असेही मुलाखत पत्रिकेद्वारा संकलित कलेल्या माहितीवरून दिसून आले.

जैन्याळ गावातील अभ्यासासाठी निवडलेल्या ७५ उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक ३२ (६९.३%) उत्तरदात्या सध्या आपल्या घरातील केरकचरा कचराकुंडीत टाकतात. तर उर्वरित २३ (३०.७%) उत्तरदात्याच्या घरातील केरकचरा गारीत टाकतात असे त्यांनी सांगितले.

अभ्यासासाठी निवडलेल्या उत्तरदात्यांच्या सांगण्यावरून आणि स्वत: केलेल्या निरीक्षणावरून असे दिसून आले की, घरातील व सार्वजनिक ठिकाणे या सर्व केरकचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावली जाते.

## ब) पर्यावरण संवर्धन विषयक कार्यक्रमांमुळे घडून आलेले बदल :

### १) वृक्षारोपण :

अभियानपूर्वकाळात गावात घाणेरी वनस्पतींची अतिक्रमणे अधिक होती. तसेच अनेक प्रकारची झाडे होती. पण झाडांकडे तितकेसे लक्ष दिले जात नव्हते. पण अभियानकाळात मात्र पर्यावरणीय संवर्धन करण्यासाठी 'झाडे लावणे, झाडे जगवणे' हा कार्यक्रम राबविण्यात आला. गावासंबंधीच्या अहवालात दिलेल्या माहितीनुसार, आभियानकाळात ३१,१६८ इतके वृक्षारोपण केले असून यामध्ये बदाम, पेरू, आंबा, पिंपळ, करंजी, कवठ, गुलमोहर, शेवगा इ. वृक्षांचा समावेश होता. सर्व झाडे जगविण्याचाही प्रयत्न केला होता. अभियानकाळात प्रत्येक घराजवळ परसबागा तयार केल्या. गावातील सांडपाण्यावर औषधी वनस्पती लावल्या होत्या. गावाच्या सार्वजनिक विहिरीजवळ औषधी वनस्पतींची बाग आजही दिसून येते.

अभियानकाळात गावाने सांडपाण्याचा पुर्नःवापर करून जवळपास ०.५ एकर क्षेत्रावर वनऔषधी निर्मिती प्रकल्प राबविला आहे. यामध्ये एकूण २४ प्रकारच्या औषधी वनस्पतींची लागवड करून लोकांना औषधी वनस्पतींचे महत्त्व पटवून दिले होते. यामधून गावामध्ये जास्तीत जास्त औषधी वनस्पतींची लागवड करून कच्चा माल तयार करून त्याद्वारे उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न केला होता. तसेच रस्त्याच्या दुतर्फा दुरांडा, केळीची व बदामाची झाडे लावली त्यामुळे गावात प्रवेश करताना उद्यानात प्रवेश केल्याप्रमाणे वाटते. प्रत्येक झाडास कुंपण करून ते झाड प्रत्येक मुलांना संगोपनासाठी दत्तक देण्यात आले होते.

गावात एका ठिकाणी २०० ते २५० विविध प्रकारची तुळस रोपटी लावून 'ऑक्सीजन पार्क' निर्माण करून याद्वारे शुद्ध हवा मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. सदर पार्कभोवती बसण्यासाठी कट्टे केलेले आहेत. सदर कट्ट्यावर रोज सायंकाळी वयस्कर

लोक बसतात. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर त्याचा चांगला परिणाम ग्रामस्थांना जाणवून आलेला आहे. स्मशानभूमीत मयत व्यक्तीच्या नावे तेथे एक वृक्ष लावून त्याची जोपासना उत्तम प्रकारे संबंधितांचे नातेवाईक करतात.

शाळेभोवती पूर्वी खूप कमी झाडे होती. अभियान काळात बदाम, अशोक, फुलांची अशी अनेक प्रकारची झाडे लावण्यात आली होती. सध्याही शाळा अनेक झाडांच्या हिरवळीने फुललेली दिसून आली.

### २) अपारंपारिक ऊर्जा :

अभियानपूर्व काळात गावात अपारंपारिक ऊर्जा साधनांच्या वापराकडे तितकेसे लक्ष दिले जात नव्हते. अभियान राबविण्यापूर्वी साधी चूल, स्टोव्ह यांचा वापर केला जात असे. अभियानापूर्वी गावात ५१ गोबर गॅस प्लँट होते. अभियानापुर्वी गावामध्ये एकही सुधारीत चूल नव्हती. परंतु अभियानकाळात निर्धुर चूलीचे महत्त्व संपूर्ण कुटुंबाना पटवून दिल्यामुळे सध्या गावात २२५ निर्धुरचुली, २४ गॅस सिलेंडर, ५१ सुधारीत चुलींचा वापर गावातील कुटुंबे करीत आहेत अशी माहिती समजली. तसेच अभियान काळात २० गोबर गॅस प्लँटची निर्मिती केली. त्यामुळे सध्या ७१ गोबर गॅस प्लँटस् असून ते वापरात आहेत. सध्या गावात सोलर कुकर वापरणारी ४ कुटुंबे तर सौर कंदील वापरणारी १३ कुटुंबे आहेत.

अभियानकाळात लोकवर्गणीतून तसेच शाहू साखर कारखान्यामार्फत दिलेल्या देणगीतून सौरऊर्जेचे ५० हजार रुपये किंमतीचे सौर दिवे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे गावातील सर्व स्ट्रीट लाईटस् सौर ऊर्जेवरील आहेत. 'महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून स्ट्रीट लाईटसाठी घेतली जाणारी वीज बंद करणारे जैन्याळ हे महाराष्ट्रातील पहिले गाव आहे. ७५ उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीनुसार गावात अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर होत आहे.

### ३) जलसंधारण आणि जलसंवर्धन कार्यक्रम :

अभियानापूर्वी गावात खूपच पाणी टंचाई होती. पाणी टंचाईची समस्या अभियानामुळे दूर झाल्याचे दिसून येते. अभियानामुळे गावात घडून आलेल्या बदलांमध्ये जलसंधारण आणि जल संवर्धन कार्यक्रम हा गावातला खूप महत्त्वाचा बदल आहे. गावात पाणी आडवा पाणी जिरवा या कार्यक्रमाला प्राधान्य दिले होते. ग्रामसभेने पाणलोट आराखडा तयार करून अंमल करण्याचा संकल्प केला होता. गावातील पाणी टंचाई लक्षात घेऊन लोकसहभागातून एकूण ४ ठिकाणी वनराई बंधारे घातले आहेत. तसेच ६ ठिकाणी पक्के बंधारे घातले आहेत व २६ ठिकाणी समतल चर घालून पाणी आडविण्याचे काम केले होते. त्यामुळे जवळपासच्या विहिरीतील पाण्याच्या पातळीत वाढ झाली असल्याचे ग्रामसेवकांनी सांगितले.

## क) सामाजिक जीवनातील बदल :

ग्रामस्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीमुळे जैन्याळ गावातील सामाजिक जीवनात खालील ठळक बदल झाले आहेत.

### १) आरोग्यविषयक जाणीव :

अभियानापूर्वी गावात अस्वच्छता आणि दूषित पाणी यामुळे अनेक जलजन्य रोगांचा प्रादुर्भाव होता. ग्रामस्थांमध्ये आरोग्यविषयक जाणीव खूपच कमी प्रमाणात होती. स्वच्छता अभियान गावात सुरू झाले तेव्हापासून गाव स्वच्छ होण्यास सुरूवात झाली. त्याचबरोबर विविध कार्यक्रमांमुळे गावातील लोकांमध्ये आरोग्यविषयक जाणीवही वाढली आहे. गावात अभियान राबविल्यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्य व पर्यावरणाच्या जाणीवेत वाढ झालेली आहे. शौचालयानंतर व जेवणापूर्वी, जेवणानंतर साबणाने हात धुणे, आंघोळीसाठी नियमितपणे साबण वापरणे, कपड्यांची व केसांची स्वच्छता राखणे इ. विषयी ग्रामस्थांचे उद्‌बोधन झाले. यामुळे ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्त्व पटले आहे.

विशेष करून अभियानकाळात प्राथमिक शाळेतील मुलांच्या आरोग्याकडे अधिक लक्ष देण्यात आलेले होते. अभियानकाळात शाळेतील मुलांची एक दिवस नखे कापली, केस कापले, स्वच्छ गणवेशाची तपासणी केली. तसेच आरोग्यविषयक प्रशिक्षण देण्यात आले. सध्याही शाळेत आठवड्यातून एक दिवस नखे तपासणे, केस स्वच्छता, गणवेश स्वच्छता, दातांची निगा राखणे याविषयी तपासणी केली जाते. त्यामुळे मुलांचे आरोग्य चांगले असल्याचे समजले. अभियान काळात मुलींच्या जटांचे निर्मुलन याकडे अधिक लक्ष दिल्यामुळे मुलींचे आरोग्य चांगले राहिले आहे. निरोगी जीवनासाठी स्वच्छतामय जीवन जगणे महत्त्वाचे आहे. हा संदेश शाळेतील सर्व मुलांपर्यंत पोहोचला आहे.

अभियानकाळात सदृढ माता व बालक स्पर्धा घेतली होती. त्यावेळी माता-बाल संगोपन करण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन केले गेले. बालकांना व त्यांच्या मातांना वेळोवेळी लसीकरण दिले होते. तसेच पोलिओ सारखे डोस सुद्धा वेळोवेळी दिले जात असल्याचे उत्तरदात्यांनी सांगितले.

### २) सामाजिक समस्येवरील उपाययोजना :

अभियान काळात जैन्याळ गावातील तरुणांनी हुंडा या सामाजिक समस्येवर उपाय योजना केली होती. तरुण-तरुणी एकत्र येऊन 'यापुढे आपण हुंडा घेणारही नाही आणि देणारही नाही.' अशी शपथ पेटत्या मेणबत्तीवर हात धरून गेतली. दारिद्र्याच्या समस्येवरही काही उपाययोजना करण्यात आल्या. दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या ग्रामस्थांना पशूपालन, दुग्धव्यवसाय, रेक्झीन बॅग तयार करणे असे स्वयंरोजगार देऊन त्यांना दारिद्र्यमुक्त करण्याचा प्रयत्न झाला. अभियानकाळात, व्यसनमुक्तीसाठी खास प्रयत्न करण्यात आले. गावातील दारूचे अड्डे महिलांनी उध्वस्त करून गाव व्यसनमुक्त केला होता.

अभ्यासासाठी निवडलेल्या ७५ उत्तरदात्यांच्या कुटुंबातील तरुणांनी खरोखरच हुंडा देणारही नाही आणि हुंडा घेणारही नाही अशी शपथ घेतली असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच महिला मंडळातील महिलांनी दारूचे अड्डे उध्वस्थ केल्याचेही सांगितले.

### ३) स्त्रीयांचे सबलीकरण :

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाबरोबरच जैन्याळ गावाने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. 'घर गृह स्वामिनीचे' हा उपक्रम १००% राबवून जिल्ह्यात आदर्श निर्माण केला. २८६ कुटुंबामधील गृहिणींची नावे एकाचवेळी सातबाराच्या उताऱ्यावर उतरली आणि ३ जानेवारी २००४ या सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिवशी खऱ्या अर्थाने जैन्याळ गावाच्या महिला घराच्या मालकीणी झाल्या, म्हणजे त्या 'गृहस्वामिनी' झाल्या. 'घर स्वामिनीचे' हा उपक्रम यशस्वी केल्यामुळे महिलांना अण्णासाहेब नवणे यांच्या हस्ते १०,००० रु. धनादेश व सन्मानपत्र देऊन महिलांचा गौरव करण्यात आला. जैन्याळ गावातील महिला या पुरूषाच्या बरोबरीने आहेत याचे निदर्शक म्हणून स्वातंत्र्य दिनादिवशी ध्वजारोहण गावातील ज्येष्ठ महिलांच्या हस्ते केले जाते.

अभियानकाळात 'घर तिथं शौचालय' ही योजना सुरू केल्यानंतर उघड्यावर शौचास करणाऱ्या व्यक्तीस १०० रु. दंड आणि उघड्यावर शौचास बसणारी व्यक्ती दाखवून देणाऱ्या व्यक्तीस ५० रु. बक्षिस महिलांनी लावले होते. अभियान काळात गावातील सरस्वती युवती मंडळाच्या तरुणींनी गावातील संपूर्ण कुटुंबाच्या आरोग्याची जबाबदारी उचलली होती. तसेच वैयक्तिक आरोग्याविषयी सर्व महिलांना मार्गदर्शन केले होते. वैयक्तिक स्वच्छतेविषयी साक्षर महिलांनी प्रत्येक महिलेच्या घरी जाऊन अभियानासंबंधीची माहिती सांगितली होती.

अभियानकाळात महिलांचे आर्थिक सबलीकरण घडवून आणण्यासाठी प्रयत्न झाला. पापड करणे, मशीनवरच्या शेवया बनविणे, शिलाई काम हे स्वयंरोजगार महिलांना दिले होते. महिला बचत गटातील महिलांसमोर सावित्रीबाई फुलेंचा आदर्श आहे. गावात महिला डेअरी उभी करून डेअरीचे चेअरमन महिला असल्यामुळे संपूर्ण डेअरीचा कारभार महिला पाहत असल्याचे अभ्यासासाठी निवडलेल्या उत्तरदात्यांनी सांगितले.

अभियानामूळेच जैन्याळ गावातील महिला खऱ्या अर्थाने घराबाहेर पडल्याचे अभ्यासासाठी निवडलेल्या उत्तरदात्यांनी सांगितले. अनेक महिलांना अभियानामुळेच व्यासपीठावर बोलण्याची संधी मिळाली होती. सामाजिक कार्यात पुरूषाच्या बरोबरीने काम करू लागल्या. अभियान काळात सरस्वती युवती मंडळाने साक्षरता अभियान राबवून अनेक निरक्षर महिलांना साक्षर केले.

**४) सामाजिक ऐक्य :**

अभियानकाळापूर्वी जैन्याळ गाव एक नंबरचा राजकारणी गाव असल्यामुळे गावात नेहमी भांडणे, मारामाऱ्या, संघर्ष होत असायचे. पण अभियानामूळे गावातील राजकीय गटातील संघर्ष कमी झाले. त्यामुळे गावात सामाजिक ऐक्य वाढले. गावातील मारामाऱ्या भांडण तंटे बंद झाले. यामुळे गाव अभियानात राज्य पातळीवर पोहचल्याचे दिसून येते. गावातील सर्व सण उत्सव सार्वजनिक ठिकाणीच साजरे केले जातात. त्यामध्ये 'एक गाव एक गणपती' हा उत्सव संपूर्ण गाव एकत्र येऊन साजरा करते. सामाजिक शांतता, सुरक्षितता राखण्यासाठी नशाबंदी, व्यसनमुक्ती मोहिम राबविली आहे. गावातील सर्व घरांना एकच रंग दिला आहे. त्यावरूनही गावातील समानतेचा व एकतेचा प्रत्यय येतो. अभियान राबविल्यामुळे गावातील एकीची भावना वाढल्याचे ग्रामस्थांनी अनौपचारिक चर्चेच्या वेळी सांगितले.

**अभियानात सहभागी होण्यापूर्वीची, अभियानकाळातील आणि सध्याची स्थिती : गावकऱ्यांची निरीक्षणे'**

पाणी पुरवठा आणि ग्रामीण परिसराच्या स्वच्छतेशी निगडीत असलेल्या विविध बाबींच्या संदर्भात जैन्याळ गावात ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यापूर्वी, अभियानकाळात आणि सध्याची कशी परिस्थिती आहे याविषयी अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील ७५ उत्तरदात्यांकडून माहिती संकलित करण्यात आली होती. जवळ जवळ सर्वच उत्तरदात्यांनी दिलेली माहिती सारखीच होती. उत्तरदात्यांनी दिलेल्या सदर माहितीच्या

आधारे तयार केलेला तक्ता खाली दिला आहे. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामुळे जैन्याळ गावात घडून आलेला बदल ठळकपणे सारांश रूपात खालील तक्त्यावरून दिसून येईल.

## अभियानात सहभागी होण्यापूर्वीची, अभियान काळातील आणि सद्याची स्थिती : गावकऱ्यांची निरीक्षणे (उत्तरदात्यांची)

| अ.क्र. | बाबी | अभियानापूर्वीची स्थिती | अभियानकाळातील स्थिती | सध्याची स्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | गावातील रस्त्यांचे स्वरूप | गावातील रस्ते कच्चे व खाच-खळग्यांनीयुक्त होते. | अभियानकाळात रस्त्यांची किरकोळ दुरूस्ती करून खाचखळगे भरून काढले. गावातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे ठरविले. | रस्त्यांची दुरूस्ती व डांबरीकरण झाल्याचे दिसून येते. |
| २ | गावातील रस्त्यांची स्वच्छता | गावातील रस्त्याची म्हणावी तेवढी स्वच्छता नव्हती. | गावकऱ्यांनी श्रमदानाच्या माध्यमातून गावातील रस्त्यांची स्वच्छता केली. | सध्या रस्त्यांची स्वच्छता असून रस्त्यांच्या दोन्ही बाजुला दुरांडा फुलविलेला आहे. |
| ३ | गावातील गटारींची स्थिती | गावातील गटारे घाणीने तुडूंब भरलेली होती. त्यामुळे गटारीतून सांडपाण्याचा निचरा होत नव्हता. यामुळे घराभोवती व रस्त्यावर सांडपाणी साचत होते. | सांडपाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी गटारींची दुरूस्ती करून घेतली. | सध्या मात्र गटारीचे भूमिगत बांधकाम करून सांडपाणी व्यवस्थापन केलेले आहे. |
| ४ | घरगुती कचऱ्याची विल्हेवाट | घरगुती केरकचरा घरासमोर मोकळ्या जागेत व गारीत टाकला जात होता. | घरगुती कचरा गांडूळ खतासाठी सार्वजनिक कचरा कोंडाळ्यात व शेती असणाऱ्या कुटुंबांनी कंपोस्ट खतासाठी कचरा गारीत टाकण्यास सुरूवात केली. | घरगुती कचरा सध्याही सार्वजनिक कचरा कोंडाळ्यात टाकतात व शेतकरी घरातील कचरा कंपोस्ट खतासाठी गारीत टाकतात. |
| ५ | गावातील सांडपाणी व्यवस्थापन | गटारी व्यवस्थित नसल्यामुळे गटारीतून सांडपाणी व्यवस्थित वाहत नव्हते ते रस्त्यावर व घराभोवती साचून राहत होते. त्यामुळे डासांचे साम्राज्य अधिक होते. | गटारींची किरकोळ दुरूस्ती करून घेतली त्यामुळे सांडपाणी व्यवस्थित गटारीतून वाहते. याबरोबर आवश्यक तेथे शोषखड्डे बांधण्याचे ठरविले. | गटारींचे बांधकाम करून घेतल्यामुळे सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होत आहे. तसेच ज्या कुटुंबांच्या घरांना गटारी जोडली नाहीत अशा घरांनी शोषखड्ड्यांचे बांधकाम करून घेतले आहे. सांडपाण्यावर अनेक ठिकाणी परसबागा फुलविल्या आहेत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | सौर ऊर्जेचा वापर | गावात सौर ऊर्जेचा वापर नव्हता. | गावात सौर ऊर्जेचा वापर सुरू केला. | गावात सौर ऊर्जेचा वापर रस्त्यावरील दिव्यांसाठी केला जात आहे. |
| ७ | पिण्याचे पाणी : स्वच्छता व उपलब्धता | पिण्याच्या पाण्यासाठी सार्वजनिक विहिरीचा वापर करत होते. गाव पूर्वी पाणीटंचाईग्रस्त होता. टँकरने उन्हाळ्यात पाणी पुरविले जाते. | पिण्याच्या पाण्यासाठी सार्वजनिक विहिरीत टी.सी.एल. पावडर योग्य प्रमाणात व वेळेवर नियमित टाकण्याची कार्यवाही सुरू केली. गावच्या पाणी पुरवठा योजनेचे किरकोळ दुरूस्ती करून घेतली. | विंधन विहिरीवरूनच गावाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो. उन्हाळ्यात रेशनिंग पद्धतीने पाणी दिले जाते. दररोज टी.सी.एल. पावडर टाकून पाणी निर्जंतुकीकरण करूनच पिण्यासाठी वापरले जाते. |
| ८ | शौचालयाचा वापर | गावातील सुमारे ७०% ग्रामस्थ शौचालयासाठी उघड्यावर जात होते. | गाव हागणदारीमुक्त करण्यासाठी 'घर तिथं शौचालय' करण्याचे ठरविले आणि ज्यांची शौचालये बंद पडली होती ती दुरूस्त करून घेतली. | गाव हागणदारीमुक्त आहे. गावातील १००% लोक शौचालयाचा नियमितपणे वापर करतात, असे लोकांकडून समजले. |
| ९ | निर्धुर चुली | निर्धुर चुलीचा वापर नव्हता पण साध्या चुली होत्या. | निर्धुर चुली वापरास सुरूवात केली. | निर्धुर चुलीचा वापर नियमित असल्यामुळे गावात धुराचे प्रदुषण कमी झाले आहे. |
| १० | गावातील व्यसनाधीनता | गावात व्यसनाधीनता मोठ्या प्रमाणात होती. | गाव व्यसनमुक्त करण्याची कार्यवाही सुरू केली. | संपूर्ण गाव व्यसनमुक्त आहे. क्वचित एखाद-दुसरी व्यक्ती व्यसनी आहे, असे अनौपचारिक बोलण्यातून समजून आले. |
| ११ | जनावरांची व गोठ्याची स्वच्छता | जनावरांची व गोठ्याची तितकीशी स्वच्छता केली जात नव्हती | जनावरांची व गोठ्याची स्वच्छता केली तसेच स्वच्छ जनावरे व स्वच्छ गोठा स्पर्धा घेतली. | सध्या ग्रामस्थ जनावरे व गोठा स्वच्छ ठेवतात. जनावरांच्या गोठ्यातील घन कचऱ्याचे कंपोष्ट खत तयार करतात. |
| १२ | गांडूळ खत प्रकल्प | गावात गांडूळ खत प्रकल्प नव्हता. | गांडूळ खत प्रकल्प सुरू केल्यामुळे कचऱ्यांची योग्य विल्हेवाट लावली. | अभ्यास भेटीच्या वेळी गांडूळ खत प्रकल्प बंद आहे. असे दिसून आले. |
| १३ | गप्पी मासे पैदास केंद्र | गप्पी मासे पैदास केंद्र नव्हते. | डासांचे साम्राज्य नष्ट करण्यासाठी गप्पी मासे पैदास केंद्र सुरू केले. | सध्या गप्पी मासे पैदास केंद्र बंध आहे, असे भेटीच्या वेळी दिसून आले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | ऑक्सीजन पार्क | ऑक्सीजन पार्क अस्तित्वात नव्हता. | ऑक्सीजन पार्क (तुळस रोपटी लागवड) तयार करण्यात आला. | ऑक्सीजन पार्कमध्ये २०० ते २५० विविध प्रकारची तुळस रोपटी लावून त्याद्वारे शुद्ध हवा मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदर पार्कभोवती बसण्यासाठी कट्टे केलेले आहेत. रोज सायंकाळी त्या कट्ट्यांवर वयस्कर लोक बसतात व त्यामुळे प्रकृतीवर त्याचा चांगला परिणाम ग्रामस्थांना जाणवतो. |
| १५ | व्यक्तिगत आरोग्यविषयक जाणीव | व्यक्तिगत आरोग्यविषयक जाणीव कमी प्रमाणात होती. | ग्रामस्थांना स्वच्छतेचे व आरोग्य विषयक मार्गदर्शन केल्यामुळे व्यक्तिगत आरोग्यविषयक जाणीव व अधिक प्रमाणात झाली. | व्यक्तिगत आरोग्यविषयक जाणीव अधिक् प्रमाणात झालेली आहे, ती टिकून असल्याचे चर्चेतून जाणवले. |
| १६ | परिसर स्वच्छतेची जाणीव | ग्रामस्थांना परिसर स्वच्छतेची अजिबात जाणीव नव्हती. | घर व परिसर स्वच्छ स्पर्धा घेतल्यामुळे परिसर स्वच्छतेची जाणीव निर्माण होऊ लागली. | ग्रामस्थ सध्या घर व परिसर स्वच्छ ठेवतात, त्यावरून परिसर स्वच्छतेची जाणीव अधिक प्रमाणात आहे, हे सूचित होते. |
| १७ | संस्कार वाहिनीचा वापर | संस्कार वाहिनीचा वापर नव्हता. | ग्रामस्थांना ग्रामस्वच्छता अभियानाची माहिती देण्यासाठी व त्यांना एकत्र बोलाविण्यासाठी संस्कार वाहिनीचा वापर सुरू केला. | संस्कार वाहिनीचा नियमित वापर केला जातो. दररोज सकाळी भक्तिसंगीत ग्रामस्थांना ऐकवले जाते. |
| १८ | कुऱ्हाडबंदी / वृक्षतोड बंदी | गावात वृक्षतोड / कुऱ्हाडबंदी नव्हती | पर्यावरण संवर्धनासाठी कुऱ्हाड बंदी / वृक्षतोडबंदी करण्यात आली. | सध्याही कुऱ्हाडबंदी / वृक्षतोडबंदी आहे. |
| १९ | गावातील ऐक्य | गाव राजकारणी असल्यामुळे गावात मारामाऱ्या, भांडण-तंटे नेहमीच असायचे, महिन्यातून एक तरी केस पोलिस स्टेशनला असायची. | अभियानामुळे गावातील भांडण-तंटे, मारामाऱ्या बंद झाल्या असून गावातील ऐक्य निर्माण होण्यास सुरूवात झाली. | अभियान यशस्वीपणे राबविले व त्यात यशस्वी होण्यास ऐक्य व सहभाग यांची गरज असते अभियानामुळे सध्या गावात मोठ्या प्रमाणात ऐक्य आहे, असे दिसून येते. |

## क) विभाग तिसरा : ग्रामस्वच्छता अभियानातील जैन्याळच्या यशाला जबाबदार असलेले घटक

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाअंतर्गत, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत जैन्याळ गावाला सन २००२ सालापासून सातत्याने बक्षिसे मिळाली आहेत. सन २००२-०३ मध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक व जिल्ह्यात दुसरा (विभागून) नंबर मिळाला. त्यामुळे तालुक्यातून रु. २५०००/- चे तर जिल्ह्यातून रु. १,५०,०००/- चे बक्षिस यांना मिळाले. सन २००३-०४ मध्ये तालुक्यात प्रथम, जिल्ह्यात प्रथम व पुणे विभागात प्रथम क्रमांक पटकावून जैन्याळ गावाने मोठीच झेप घेतली. त्यामुळे सन २००३ मध्ये तालुका स्तरावर प्रथम क्रमांक व १,५०,०००/- चे बक्षिस व प्रमाणपत्र मिळाले. जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक व ५,५०,०००/- चे बक्षिस व प्रमाणपत्र मिळाले. विभाग स्तरावर प्रथम क्रमांक व १०,००,०००/- चे बक्षिस व पारितोषिक मिळाले. सन २००४ मध्ये राज्यस्तरीय तिसरा क्रमांक (विभागून) मिळाला असून ६,२५,०००/- चे बक्षिस व पारितोषिक मिळाले. सन २००५ मध्ये 'निर्मलग्राम' हा पुरस्कार व २,००,०००/- चे बक्षिस व पारितोषिक मिळाले आहे. तसेच सन २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाने सुरू केलेला यशवंत ग्राम पुरस्कार जैन्याळला मिळाला आहे. जैन्याळ गावाला मिळालेल्या या यशाला जबाबदार असलेल्या काही महत्त्वपूर्ण घटकांची चर्चा या विभागात केली आहे.

### १) जैन्याळ गावाचा लहान आकार :

गावाचा लहान आकार हे स्वच्छता अभियानातील जैन्याळच्या यशाचे एक महत्त्वाचे कारण म्हणता येईल. गावाची एकूण लोकसंख्या १६३२; त्यापैकी स्त्रियांची संख्या ८२५ इतकी तर पुरूषांची संख्या ८०७ इतकी आहे. गावात एकूण २८६ कुटुंबे आहेत.

सी. एच. कुलें (C. H. Cooley) यांच्या मताप्रमाणे 'खेडे' हा प्राथमिक समूह

आहे. घनिष्ठ असे समोरासमोरचे साहचर्य आणि सहकार्य प्रधान संबंध या वैशिष्ट्यांनी युक्त अशा समूहांना प्राथमिक स्वरूपाचे समूह म्हणतात. जैन्याळ गावाला प्राथमिक समूह मानता येईल. जैन्याळ गावातील सदस्यांमध्ये घनिष्ठ स्वरूपाचे संबंध निर्माण झालेले आहेत. हा समूह लहान असल्यामुळे त्यांच्यात प्रत्यक्ष आंतरक्रियांची घनता अधिक असल्याचे दिसून येते. परिणामी एकमेकांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वांचा परस्परांना जवळून परिचय झालेला आहे. तसेच एकमेकांच्या सवयी, गुणावगुण यांची परस्परांना माहिती आहे. गावातील व्यक्ती प्रदीर्घकाळ परस्परांच्या सान्निध्यात राहून आंतरक्रिया करतात. त्यामुळे त्यांच्यात सातत्यपूर्ण संबंध असल्याचे दिसून येते.

गावातील लोकांमध्ये घनिष्ठ संबंध आहेत. या घनिष्ठ संबंधात आपलेपणा, प्रेम, जिव्हाळा, आदर निष्ठा इ. भावनांची गुंतवणूक आहे. गावातील व्यक्तींमध्ये व्यक्तिगत संबंध आहेत. लोकांमधील संबंध हे खेळीमेळीचे आणि अनौपचारिक आहेत. गावात व्यक्ति-व्यक्तींमधील संबंध अगदी स्वाभाविक वा नैसर्गिक आहेत. अगदी सहजगत्या उत्स्फुर्तपणे ते निर्माण झालेले आहेत. तसेच जाणीवपूर्वक वा हेतूत: हे संबंध निर्माण केले गेलेले नसून ते वारंवार येणाऱ्या संपर्कामुळे निर्माण झालेले आहेत.

लहान आकाराच्या समुहांचे सामाजिक संघटन कमी गुंतागुंतीचे असते. त्यामुळे ग्रामस्वच्छता अभियानासारख्या सामूहिक कार्यक्रमांसाठी लोकांना एकत्र येणे व समूहभावनेने उद्दिष्टसिद्धीसाठी प्रयत्न करणे जैन्याळला शक्य झाले. त्यामुळेच जैन्याळला स्पर्धेत यश मिळविता येणे शक्य झाले असे म्हणता येईल.

### २) कामाचे सुयोग्य नियोजन व संघटित मनुष्यबळाचा कौशल्यपूर्ण वापर:

काही विशिष्ट उद्दिष्ट्ये साध्य व्हावीत यासाठी हेतुपूर्वक आणि जाणीवपूर्वक तयार करण्यात आलेली सामाजिक यंत्रणा म्हणजे संघटन होय. या व्याख्येप्रमाणे जैन्याळ गावात अभियान राबविण्याचे उद्देश डोळ्यासमोर ठेऊन गाव स्वच्छ करणे हे उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी सुयोग्य संघटन करण्यात आले होते.

गावात अभियानाअंतर्गत सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी एका अभियान कमिटीची स्थापना करण्यात आली होती. गावातील ११ तरुण मंडळे, २४ बचत गट, १ महिलामंडळ, १ व्यसनमुक्ती कमिटी या सर्वांच्या संघटित शक्तीचा कुशल उपयोग अभियान कमिटीने केला. गल्लीवार मंडळे स्थापन करून सर्व कामांचे सुयोग्य वाटप करून ती कामे ग्रामस्थांकडून व्यवस्थितरित्या करून घेतल्याचे चर्चेतून तसेच निरीक्षणावरून दिसून येते.

**३) ग्रामस्थांचा ग्रामस्वच्छता अभियानातील मोठ्या प्रमाणावरील सहभागः**

गावात व्यापक प्रमाणावरील परिवर्तन घडवून आणण्यासाठी संघटितरित्या गावातील अनेक लोकांनी एकत्र येऊन जाणीवपूर्वक आणि हेतूत: सामूहिक प्रयत्नाद्वारे सामाजिक परिवर्तन घडवून आणले आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने गाव लहान असल्यामुळे गावातील अभियानात ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणावरील सहभाग होता. स्वच्छता अभियानात प्रौढ स्त्री पुरूष व मुले मुलींचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता. यामुळे गाव स्वच्छ व सुंदर होऊन जैन्याळ गावाने महाराष्ट्र राज्यपातळीवर प्रसिद्धी मिळविली आहे.

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील कुटुंबातील सदस्यांचा अभियानातील सहभाग दर्शविणारा तक्ता खाली दिला आहे. त्यावरून गावातील लोकांचा अभियानात किती सहभाग होता हे दिसून येते.

निवडलेल्या नमुन्यातील ७५ उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्री-पुरूष सदस्य यांचा ग्राम स्वच्छता अभियान (त्या अंतर्गत राबविलेले विविध उपक्रम) राबविण्यामधला सहभाग किती प्रमाणात होता, या विषयीची माहिती मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने गोळा केली होती. सदर माहितीवरून तयार केलेली सारणी खाली दिली आहे.

## नमुना कुटुंबातील व्यक्तीचा जैन्याळ गावातील ग्रामस्वच्छता अभियानातील सहभाग दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | उपक्रम | सहभागी झालेल्या प्रौढ व्यक्तींची संख्या | | | सहभागी झालेल्या प्रौढ व्यक्तींची टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्रीया | एकूण | पुरूष टक्केवारी | स्त्रीया टक्केवारी | एकूण टक्केवारी |
| १ | अभियाना संबंधी ग्रामसभा | ११२ | ११९ | २३१ | ९७.३९ | ८८.१४ | ९२.४ |
| २ | ग्रामसफाई व कचरामुक्ती दिवस | ११० | १०६ | २१६ | ९५.६५ | ७८.५१ | ८६.४ |
| ३ | शोषखड्डे स्वच्छता व बांधकाम दिवस | १०९ | ३३ | १४२ | ९४.७८ | २४.४४ | ५६.८ |
| ४ | शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता दिवस | ८३ | ३९ | १७२ | ७२.१७ | २८.८८ | ६८.८ |
| ५ | घर व परिसर स्वच्छता दिवस | ८० | १२५ | २०५ | ६९.५६ | ९२.५९ | ८२.० |
| ६ | स्वच्छताविषयक साहित्य प्रदर्शन व तांत्रिक ज्ञानाबाबतचा अभियान दिवस | १०६ | १०४ | २१० | ९२.१७ | ७७.०३ | ८४.० |
| ७ | शौचालय दुरूस्ती / बांधकाम दिवस | १०४ | ३७ | १४१ | ९०.४३ | २७.४० | ५६.४ |
| ८ | पाणी शुद्धता, प्रात्यक्षिक व प्रशिक्षण दिवस | ९५ | ११६ | २११ | ८२.६० | ८५.९२ | ८४.४ |
| ९ | वैयक्तिक स्वच्छता दिवस | १०५ | १२७ | २३२ | ९१.३० | ९४.०७ | ९२.०८ |
| १० | रस्ते दुरूस्ती व श्रमदान दिवस | ११५ | ६६ | १८१ | १०० | ४८.८८ | ७२.४ |
| ११ | जनावरे स्वच्छता मोहिम दिवस | ८८ | ७८ | १६६ | ७६.५२ | ५७.७७ | ६६.४ |
| १२ | वृक्षसंवर्धन परसबाग अपारंपारिक ऊर्जा दिवस | ८९ | ६४ | १५३ | ७७.३९ | ४७.४० | ६१.२ |
| १३ | गावात स्लोगन, निबंध स्पर्धा, व्यसनमुक्त दिवस | ८३ | ५१ | १३४ | ७२.१७ | ३७.७७ | ५३.६ |
| १४ | सदृढ बालक स्पर्धा, मातांची तपासणी, लसीकरण इ. | ११ | २० | ३१ | ९.५६ | १४.८१ | १२.४ |
| १५ | सांडपाणी निर्मुलन, सांडपाण्याचा पुर्न:वापर दिवस | १०२ | १०९ | २११ | ८८.६९ | ८०.७४ | ८४.४ |
| १६ | संकल्प दिवस | १०० | १२६ | २२६ | ८६.९५ | ९३.३३ | ९०.४ |
| | टक्केवारीची सरासरी | - | - | - | ८१.०८ | ६१.१० | ७१.५५ |
| | ७५ कुटुंबातील सदस्यांची एकूण संख्या | ११५ | १३५ | २५० | - | - | - |

नमुना कुटुंबातील सदस्यांच्या अभियानातील सहभागाविषयीच्या वरील आकडेवारीवरून खालील ठळक निष्कर्ष काढता येतील.

१) नमुना कुटुंबातील प्रौढ पुरूष व स्त्रियांचा अभियानातील सरासरी सहभाग ७१ टक्क्यांहून अधिक होता, यावरून जैन्याळ गावातील संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात लोकांचा सहभाग अतिशय मोठ्या प्रमाणावर होता असे दिसून येते.

२) पुरूष आणि स्त्रियांच्या अभियानातील सहभागाच्या टक्केवारीची तुलना केली असता असे दिसून येते की, ग्रामस्वच्छता अभियानात स्त्रियांपेक्षा (६१.१०% सहभाग) पुरूषांचा सहभाग अधिक (८१.०८%) होता.

३) जैन्याळ गावात ग्रामस्वच्छता अभियानाअंतर्गत राबविलेल्या घर व परिसर स्वच्छता दिवस, पाणी-शुद्धता प्रात्यक्षिक व प्रशिक्षण दिवस, वैयक्तिक स्वच्छता दिवस व संकल्प दिवस या विशिष्ट कार्यक्रमात पुरूषांपेक्षा स्त्रीयांचा सहभाग अधिक प्रमाणात होता (स्त्रियांचा सहभाग अनुक्रमे ९२.५९%, ८५.९२%, ९४.०७% आणि ९३.३३% होता).

४) जैन्याळ गावात ग्रामस्वच्छता अभियानाअंतर्गत राबविलेल्या ग्रामसभा, ग्रामसफाई व कचरामुक्ती दिवस, शोषखड्डे स्वच्छता व बांधकाम दिवस, शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता दिवस, शौचालय दुरूस्ती / बांधकाम दिवस, रस्ते दुरूस्ती व श्रमदान दिवस, जनावरे स्वच्छता मोहिम दिवस, वृक्षसंवर्धन, परसबाग, अपारंपारिक ऊर्जा दिवस, गावात स्लोगन निबंध स्पर्धा, व्यसनमुक्ती दिवस या कार्यक्रमात स्त्रियांपेक्षा पुरूषांचा सहभाग अधिक प्रमाणात होता. (पुरूषांचा सहभाग अनुक्रमे - ९७.३९%, ९५.६५%, ९४.७८%, ७२.१७%, ९०.४३%, १००%, ७६.५२%, ७७.३९%, ७२.१७%, ८८.६९% होता).

४) कुशल व कल्पक नेतृत्व :

ग्रामस्वच्छता अभियानाचे नेतृत्व खऱ्या अर्थाने ग्रामसेवकांनी व माजी सरपंच यांनी केले होते असे निवडलेल्या ७५ उत्तरदात्यांनी सांगितले. ग्रामसेवकांच्या पुढाकारामुळे व गावच्या माजी सरपंचाच्या कुशल व कल्पक नेतृत्वामुळे गावात अभियान राबविण्यात फारशी अडचण भासली नाही. ग्रामसेवकांचा व गावचे माजी सरपंच यांचा अभियान यशस्वी करण्यात सिंहाचा वाटा होता. या दोन व्यक्तींच्या नेतृत्व आणि संघटन कौशल्यामुळे गावात परिवर्तन घडून आले आहे. ग्रामसेवक, माजी सरपंच, सध्याचे सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांच्या सहकार्यातून व ग्रामस्थांच्या मोठ्या प्रमाणातील सहभागामुळे अभियानात जैन्याळला यश मिळाले आहे.

सारांश वरील विश्लेषणावरून स्पष्ट होते की, ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत यश मिळविण्यासाठी जी कारणे जबाबदार ठरली त्यात जैन्याळ गावाचा लहान आकार, कामाचे सुयोग्य नियोजन आणि संघटित मनुष्यबळाचा कौशल्यपूर्ण वापर, अभियानातील ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणावरील सहभाग आणि कुशल आणि कल्पक नेतृत्व या चार बाबींचा अंतर्भाव होतो.

यानंतर पुढील पाचव्या प्रकरणात या आधीच्या चार प्रकारणांतील विवेचनाचा थोडक्यात सारांश आणि ठळक निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.